पुण्य नगरी

# आज ‘बोथगया’साठी रवाना होतील ८०० भाविक

नागपूर : महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेंतर्गत सामाजिक न्याय विभागाच्या वतीने नागपूर येथून महाबोधी मंदिर, बोधगया येथे ८०० ज्येष्ठ नागरिक बुधवारी (ता.५) विशेष रेल्वेने रवाना होतील. ५ फेब्रुवारी रोजी दुपारी २.१५ वाजता नागपूर येथील मुख्य रेल्वेस्टेशन येथून ही रेल्वे रवाना होणार आहे. याचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार असल्याची माहिती समाजकल्याण विभागाच्या साहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे यांनी दिली आहे .

Nagpur Edition

Feb 05, 2025 Page No. 01

Powered by: erelego.com